## ५१. संभाषण कला. (Communication skills)

संभाषण कलेवर बरीच पुस्तके उपलब्ध आहेत. परंतु ह्या विषयावर थोडक्यात पण महत्वाचे असे लिखाण उपयुक्त ठरेल म्हणूनच मी प्रयत्न करत आहे.

देवाने आपल्याला २ डोळे, २ कान, २ नाकपुडया पण तोंड मात्र एकच दिले आहे. याचा अर्थ सरळ आहे की आपण जास्त पहावे, जास्त ऐकावे वगैरे पण कमी बोलावे. मित्रांनो, आपण नेमके काय करतो तर जास्त बोलतो.

खरेतर संभाषण वेगवेगळया माध्यमातून साधता येते. उ.दा. चेहरा, डोळे, ओठ, लिखीतस्वरूपात. आपण ह्या सर्वांचा उपयोग अगदी न शिकता / **Acting School** मध्ये न जाता अनाहुतपणे करतोच. परंतु ह्या लेखात शब्दाने केलेले संभाषण मला अभिप्रेत आहे.

माझ्या मनात असा प्रश्न आला कि देव **(God)** आणि संभाषण यांची तुलना करता येईल का ? माझ्या मते होय. **God** ह्या शब्दांची उत्पत्ती खालीलप्रमाणे.

**G: Generation**
**O: Observation**
**D: Destroy**

ही तीन कामे ब्रह्मा, विष्णु व महेश हे देव करतात. ( पृथ्वीची निर्मीती, देखरेख व विनाश )

आपले संभाषण सुद्धा नातेसंबंध जोडते, टिकवते व मोडते.

संभाषणात बराच मोठा हिस्सा एकाने दुस-याला विचारलेल्या प्रश्नाचा असतो. प्रश्न बरोबर न विचारल्यामुळे गैरसमजुत होण्यास, गैरसमज पसरण्यास मदतच होते.

वाचकांच्या सोयीसाठी मी काही मुद्दे/सूचना तयार केल्या आहेत.

१. प्रश्न विचारताना कोणतेही अपेक्षित उत्तर नसावे ?
उ.दा. जेवायला तोंडल्याची भाजी करू का? प्रश्न असा पाहिजे की जेवायला कोणती भाजी करू? घरात अमूकअमूक भाज्या आहेत.
उ.दा. **Bank A/C** उघडायला आलात का? असे विचारण्यापेक्षा मी आपली काय मदत करू शकतो? आपले कोणाकडे काम आहे? असे विचारणे जास्त संयुक्तीक.

२. प्रश्न विचारताना २ **Alternatives** असू नयेत. उ.दा. तू आज रात्री घरी जेवणार आहेस की नाही ?
उ.दा. तुम्हाला कोणता **A/c** उघडायचाय? **Saving** कि **Current**. (**Customer** ला खरेतर **FD** मध्ये पैसे ठेवायचे असतात)

३. प्रश्न शक्यतो **Close ended** नसावा. त्यातून पुढच्या प्रश्न विचारण्याची गरज निर्माण होते.
उ.दा. आज जेवणार आहेस का ? नाही. का ?
चांगल्या संभाषणाची गरज खरेतर पदोपदी असते. मग ते घरगुती नातेसंबंध असोत किंवा कचेरीतील संभाषण असो.

४. आपण जेव्हा बोलतो तेव्हा आपल्या मनात तोच अर्थ असणे आवश्यक आहे.

५. आपल्याला जे वाटते ते बोलले पाहिजे असे नाही. (वेळ येईपर्यंत)

६. संभाषणातून दुस-याबद्यलची आस्था, जिव्हाळा, प्रेम, आपुलकी प्रतित झाली पाहिजे.

७. संभाषण नाटकी नसावे.

८. संभाषण करताना दोन माणसांमधील अंतर राखणे (संबंधांनुसार) गरजेचे असते. **(Geographical Zone)**

९. संभाषणातून बरीचशी माहिती ध्वनीत झाली पाहिजे. बरेच वेळा काही वाक्ये अशी बोलली जातात की वरकरणी ती बरोबर वाटतात पण त्यातून काहीच माहिती मिळत नाही.

उ.दा. मी मुलाला कुत्र्याशी खेळताना बघितले? मित्रांनो वाक्य बरोबरच आहे की पण कितीतरी माहिती मिळतच नाही.

उ.दा. मुलगा तुमचा होता की दुस-याचा, त्याचे वय. कुत्रा लहान होता कि मोठा ? कोणत्या जातीचा ? कधी बघितले ? तुम्ही काय करत होतात ? मुलगा व कुत्रा कोठे खेळत होते ? घरात , बागेत , रस्त्यावर ?

काय मित्रांनो करणार ना प्रयत्न चांगल्या संभाषणाचा वरील नियम लक्षात घेऊन ?

**Best of Luck**